**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी - ४११०१८
क्र.मातवि/८/कावि/५३ /२०
दिनांक- २७/०५ /२०२०

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत विकसित करणेत आलेले "पीसीएमसी स्मार्ट सारथी अँप्लिकेशन" डाऊनलोड करणेबाबत...

संदर्भ:- मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. २१/०५/२०२० रोजीची बैठक.

.

**परिपत्रक,**

"पीसीएमसी स्मार्ट सारथी" हे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. चे अधिकृत मोबाईल अँप्लिकेशन आहे. सध्या कोविड-१९ च्या संसंगर्गापासुन नागरिकांचा बचाव व्हावा यासाठी पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या माध्यमातुन विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी काही सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत-

१. वैयक्तिक पडताळणी सर्वेक्षण ((**Self Assessment Survey)**

२. जवळची ठिकाणे शोधण्याची सुविधा

३. ताज्या घडामोडींबाबत माहिती

**या व्यतिरिक्त उपलब्ध सुविधा :**

१) नागरिकांना शहरामध्ये सुरु असलेल्या विविध घडामोडींची माहिती तत्काळ उपलब्ध होईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा, सुविधांचा एक भाग म्हणून नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आरोग्य, विविध सुविधा यांच्या विषयीची माहिती उपलब्धउपलब्ध आहे.

२) नागरिकांना मिळकत कर आणि पाणीपट्टीचा भरणा करणे शक्य होईल.

३) नागरिकांना जन्म आणि मृत्यूचा दाखला प्राप्त करण्यासाठी अर्जकरणेची सुविधा.

४) नागरिक तक्रार दाखल करू शकतात तसेच त्याबाबत पाठपुरावाही करू शकतात.

५) नागरिक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबवण्यात येणाऱ्या विविध योजना आणि देण्यात येणाऱ्या विविध सेवा, सुविधा यांची माहिती प्राप्तहोणे शक्य होईल.

६) नागरिकांना वाहतुकीशी संबंधित अद्ययावत माहिती प्राप्त करणे शक्य होईल.

७) आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांची यादी करणे आणि त्यांच्या विषयी माहिती देणे 'पीसीएमसी स्मार्ट सारथी'च्या साहाय्याने शक्य होईल.

८) नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये गरजेचे असणारे रुग्णालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि पोलीस यांचे संपर्क क्रमांक इत्यादी माहिती उपलब्धहोते.

९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित बातम्या, लेख, कार्यक्रम यांची माहिती उपलब्ध होऊ शकेल.

सदर ॲप डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा

**Google paly Store** **App Store**

- गुगल प्ले स्टोअर - https://bit.ly/PCMCSmartSarathiApp
- ॲप स्टोअर - https://bit.ly/PCMCSmartSarathiIOS

तसेच सदरचे अँप मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत उपलब्ध असुन सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे मोबाईलमध्ये सदरचे अँप डाऊनलोड करणेकामी **एन्ड्राईड मोबाईल धारकांसाठी " गुगल प्ले स्टोअर"** वरुन तसेच **अँपल युजर्स करिता "अँप स्टोअर"** वर सुविधा उपलब्ध आहे. सदरचे अँप डाऊनलोड केल्यानंतर या अँपवर "रजिस्ट्रशन ( नोंदणी)" करुन वापर करणेत यावा.

तरी सदर परिपत्रकान्वये सर्व संबंधित शाखाप्रमुखांना कळविणेत येते की आपण आपले विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना " पीसीएमसी स्मार्ट सारथी " हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करुन घेणेबाबत सुचना देणेत याव्यात व आपले विभागातील एकुण अधिकारी / कर्मचारी यांचे "पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप्लिकेशन" वापराबाबतचा अहवाल खालील नमुन्यामध्ये तयार करुन सदरची माहिती , माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे दिनांक 05/06/2020 पर्यंत पाठविणेत यावी.

विभागाचे नाव-

"पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप्लिकेशन" अहवाल

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | पदनाम | मोबाईल नंबर | " पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप्लिकेशन" वापर होय / नाही |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८